# शैक्षणिक परिवर्तनासाठी कार्यरत अशा उपक्रमशील शिक्षकांना
# माननीय श्री. शरद पवार इन्स्पायर फेलोशीप

**भूमिका**

शिक्षण उद्यासाठी असते. उद्याचे सुजाण, सतर्क, सर्जनशील, कर्तबगार व सुसंस्कृत नागरिक घडविणे खऱ्या, उचित व उत्तम शिक्षणाकडून अपेक्षित असते. शिकावे कसे, शिकण्याचा आनंद कसा घ्यावा-द्यावा आणि आजन्म शिकत कसे राहावे हे शिकविते ते खरे शिक्षण. शिकता-शिकता जे उद्याची आव्हाने पेलायला सज्ज करते, उद्याच्या संधींचे सोने करायला शिकवते ते खरे शिक्षण.

एकविसाव्या शतकातील एकविसाव्या वर्षापासून शालेय शिक्षणाच्या मुलभूत पुनर्रचनेची यादृष्टीने नितांत आवश्यकता आहे. कारण विशेषत: गेल्या वर्षीपासून दैनंदिन जीवनाचे संदर्भ पार बदलून टाकणाऱ्या अनेक वेगवान महाप्रवाहांचा प्रभाव एकाच वेळी जगभर वाढू लागला आहे.

बदल घडवून आणणारे शेती, औद्योगिक क्रांती, इ. महाप्रवाह इतिहासात पूर्वीही येऊन गेले आहेत. परंतु त्यांचे जगभर परिणाम दिसायला शतके लागली. विद्युत उर्जेच्या महाप्रवाहाने जगाला कवेत घ्यायला, पृथ्वीवर ‘इलेक्ट्रिकल सिव्हिलायझेशन’ साकारायला शतक लागले. संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या महाप्रवाहाने जगावर अधिराज्य प्रस्थापित करायला अर्धशतक लागले. आताचे बदल घडविणारे महाप्रवाह मात्र कमालीचे वेगवान आहेत. त्यांचे परिणाम अनुभवास यायला आता पाच-दहा वर्षेही लागत नाहीत. त्यांच्या प्रचंड वेगापुढे मानवी समाजाची दमछाक होताना आपण पाहतो आहोत.

वेग, अधिक वेग आणि प्रचंड वेग हेच त्या महाप्रवाहांचे आणि त्यांनी प्रभावित केलेल्या मानवी जीवनाचे आता व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. यातले काही महाप्रवाह अनिष्ट आहेत तर काही इष्ट. उदाहरणार्थ एकीकडे अनिष्ट हवामान बदल तर दुसरीकडे इष्ट ज्ञानक्रांती. हे महाप्रवाह दीर्घ काळ टिकून राहतील व वेगाने वाढत जातील अशी चिन्हे आहेत. या महाप्रवाहांमुळे मानव जातीपुढे व विशेषत: विद्यार्थ्यांपुढे जशी अनेक नवी आव्हाने उभी ठाकली आहेत तशाच नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. या आव्हानानांबद्दल, संधींबद्दल सविस्तर विवेचन ‘परिशिष्ट’मध्ये दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये या आव्हानांच्या अनुषंगाने अनेक शिफारशी केल्या आहेत आणि कार्यक्रमही सुचवले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तयार केलेला कृती कार्यक्रम (SARTHAQ भाग १ आणि २), तसेच निपुण भारत अभियान हे दस्तऐवज वाचा. भारतीय संविधानाच्या तरतुदींच्या अनुषंगाने मूल्यशिक्षण, स्वयंअध्ययन आणि सहअध्ययन यांचा अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रियेत प्रभावी वापर, विविध विषयांचा परस्परांशी आणि कला व खेळ यांच्याशी समन्वय, बहुवर्ग अध्यापन, वाचताना वाचनाचा वेग आणि आकलन वाढवण्यासाठी घेतलेले उपक्रम, पालक आणि स्थानिक समाज यांचा शालेय कामकाजात आणि अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सहभाग, शाळेची इमारत आणि परिसर यांचा शैक्षणिक साधन म्हणून वापर, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत डिजिटल लर्निंगचा प्रभावी वापर, असे अनेक उपक्रम आयोजित करता

येतील. ही केवळ उदाहरणे म्हणून दिली आहेत, तरी परंतु आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन, कोणते उपक्रम निवडावे याचे संपुर्ण स्वातंत्र्य शिक्षकांना असेल.

**फेलोशिपचे तपशील**

| | |
|---|---|
| **फेलोशिपसाठी वयोमर्यादा** | **वय वर्षे ४५ किंवा त्यापेक्षा कमी वय असणारे पूर्णवेळ शिक्षक** |
| **फेलोशिपचा कालावधी** | **एप्रिल २०२३ ते एप्रिल २०२४** |
| **फेलोशिपसाठी पात्रता** | **परिशिष्ठमध्ये अंतर्भूत केलेल्या उद्दिष्टांशी सुसंगत, नियमित अध्यापन करत विद्यार्थ्यांच्या सहभागाने चालणारे व शैक्षणिक वर्षभर विकसित होत जातील असे अभ्यासक्रमेतर व वेळापत्रकेतर उपक्रम करत असलेले/ करू इच्छिणारे शिक्षक अर्ज करण्यासाठी पात्र समजण्यात येतील. तसेच २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात बदली न होणारे शिक्षकानी अर्ज करावा.** |
| **फेलोशिपची संख्या** | **२० प्राथमिक आणि २० माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक** |
| **अर्जदारांचे कार्यक्षेत्र** | **महाराष्ट्र असेल** |
| **फेलोशिपची रक्कम** | **निवड झालेल्या प्रत्येक शिक्षकास वार्षिक ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त). यातील रक्कम रुपये ४०,०००/- शिक्षकाना प्रत्यक्षात फेलोशिपमधील उपक्रमांसाठी लागणारी साधने, संभाव्य प्रवास, इत्यादीसाठी देण्यात येईल आणि उर्वरित रुपये २०,०००/- रक्कम ही कार्यशाळा आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनासाठी खर्च करण्यात येईल.** |

## अर्ज प्रक्रिया

१. इच्छुक शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ अखेर https://apply.sharadpawarfellowship.com या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करणे अपेक्षित आहे.

२. अर्जदारांनी फेलोशिपसाठी स्वत: हाती घेणार असलेल्या "शैक्षणिक परिवर्तन उपक्रमा" विषयी मराठी किंवा इंग्रजी भाषेत पुढील मुद्दयांच्या आधारे सुमारे १००० शब्दांचे टिपण अर्जासोबत जोडणे अपेक्षित आहे.

अ.

२.१ उपक्रमाचे शीर्षक

२.२ उपक्रमाची गरज, उपक्रम आपण का निवडला

२.३ उपक्रमाचे महत्व

२.४ उपक्रमाचे नाविन्य व वेगळेपण - शासकीय योजनेपेक्षा वेगळे परंतु शासकीय योजनांना पूरक

२.५ आपण यापूर्वी काही नवोपक्रम केले आहेत काय ?

२.६ यापूर्वी शासनास किवां इतर संस्थेस आपण काही नवोपक्रम सदर केले आहेत काय ?

२.७ आपल्या नवोपक्रमाची दाखल घेतली गेली आहे काय ?

असल्यास कोणत्या स्तरापर्यंत

जिल्हास्तर ☐

राज्यस्तर ☐

राष्ट्रीयस्तर ☐

२.८ उपक्रमासाठी लागणारी साधने व सोयी

२.९ आपला उपक्रम साधारण किती दिवस चालेल ?

३.० आपल्या उपक्रमाचे स्थूल वेळापत्रक

३.१ उपक्रमाची फलनिष्पत्ती पाहण्यासाठीची व्यवस्था

३.४ उपक्रमासाठीचे  अंदाजपत्रक

३.५ उपक्रमासाठीचे वेळापत्रक

४ . आपण प्रस्तावित करत असलेला उपक्रम पूर्वीपासून राबवत असाल तर त्याचा तपशील (छायाचित्र, चित्रफित, परखड मूल्यमापन इ. अर्जासोबत जोडावे.

५ . विषयनिहाय अभ्यासक्रमातील नेहमीच्या वेळापत्रकात समाविष्ट असलेले अध्ययन, अध्यापन, मूल्यमापनविषयक उपक्रम या फेलोशिपमध्ये अपेक्षित नाहीत, कृपया याची नोंद घ्यावी.

प्रतिज्ञा पत्र : मी हा उपक्रम यापूर्वी कोणत्याही खाजगी/शासकीय किवां निमशासकीय संस्थेस सादर केलेला नाही.

## शिक्षण पाठ्यवृत्तीच्या अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ज करण्याची अंतिम मुदत | १२ ऑक्टोबर २०२२ |
| २. | अर्जाची छाननी आणि निवड प्रक्रिया | १३ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर २०२२ |
| ३. | निवड झालेल्या शिक्षकांची यादी जाहीर करणे | ११ नोव्हेंबर २०२२ |
| ४. | फेलोशिप प्रदान सोहळा आणि नवीन फेलो व जूने फेलो यांचा एकत्रित परिचय आणि संवाद | ११ डिसेंबर २०२२ |
| ५. | प्रथम कार्यशाळा | २१, २२, २३ एप्रिल २०२३ |
| ६. | प्रकल्पांना भेटी | १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ |
| ७. | द्वितीय कार्यशाळा | १८,१९,२० नोव्हेंबर २०२३ |
| ८. | तृतीय कार्यशाळा व प्रकल्प अहवालाचे सादरीकरण | २६, २७, २८ एप्रिल २०२४ |